


We are two years old and we look forward to celebrate our second anniversary with the launch of 'The Royal Collection'.



# कम्युनिकेशनचा बदलता चेहरा

डॉ. गौतम पंगू (Lexinton, Kentucky (State), USA.)

Wednesday, September 08, 2010 AT 11:18 AM (IST)
Tags: pailteer, social networking, usa, gautam pangu

**स**चिन तेंडुलकरने ट्विटर जॉईन केले, आर. आर. आबा फेसबुकवरून जनतेशी संपर्क ठेवायला लागले, आमिर खान आणि अमिताभ बच्चन नियमित ब्लॉगिंग करतात...अशा बातम्या आजकाल आपल्याला वारंवार वाचायला मिळतात. फक्त या 'सेलेब्रिटीज' कशाला, फेसबुक, ट्विटर, मोबाईल वेब या गोष्टी तुमच्या आमच्या जीवनाचासुद्धा एक अविभाज्य भाग बनत चालल्यायत. एकटं फेसबुक वापरणाऱ्या जगातील लोकांची संख्याच तब्बल ५० करोडहून जास्त आहे. या गोष्टींमुळं आजच्या कम्युनिकेशनचा चेहरामोहराच झपाट्यानं बदलत चाललाय.

या नव्या माध्यमांचे फायदे आणि त्यांच्यामुळं आलेला सोपेपणा कोणीच नजरेआड करू शकणार नाही. जगभरात पसरलेल्या आपल्या मित्रांशी संपर्कात राहणं, नवीन ओळखी करून घेणं, एखादी आवडलेली गोष्ट पटकन सगळ्यांबरोबर शेअर करणं हे फेसबुक किंवा ट्विटरमुळं सहज शक्य झालंय. पु. लं. नी 'मुंबईकर, पुणेकर की नागपूरकर' मध्ये म्हणल्याप्रमाणं आपण कोण किंवा आपलं एकूण कर्तृत्व काय याचा काही विचार न करता घरातील डासांच्या त्रासापासून ते अगदी ओबामांच्या इराकविषयक धोरणापर्यंत कशावरही मत ठोकून द्यायला स्वत:चं एक हक्काचं (आणि फुकटचं!) व्यासपीठ उपलब्ध झालंय. वर उल्लेख केल्याप्रमाणं सेलेब्रिटिज आपल्या चाहत्यांशी 'मिडिया' वर अवलंबून न राहता प्रत्यक्ष संपर्क ठेवू शकतात, आपली विशिष्ट 'इमेज' ते समाजावर प्रोजेक्ट करू शकतात, एखादी संस्था नवीन घडामोडींची माहिती या माध्यमांमार्फत इच्छुक लोकांपर्यंत पोचवू शकते, एखाद्या चांगल्या उपक्रमाची विनामूल्य आणि जलद जाहिरात करता येते...याचे फायदे खरंच भरपूर आहेत! पण या माध्यमांतून माणसं खरंच एकमेकांच्या जवळ येत आहेत का? की वैयक्तिक, सामाजिक आणि व्यावसायिक या शब्दांच्या अर्थाची काहीतरी विचित्र सरमिसळ होवून एक नवीच मूल्य-व्यवस्था उदयाला येत आहे?

आजच्या धकाधकीच्या जीवनात पूर्वीसारखा निवांतपणा माणसाला मिळत नाही. पण या धावपळीतसुद्धा माणसाचं एकाकीपण काही कमी होत नाही. म्हणून या ना त्या मार्गानं आपण एकदुसऱ्याच्या संपर्कात रहायचा प्रयत्न करतो. बसस्टॉप असो किंवा विमानतळ असो, दोन माणसं एकमेकांशी बोलण्याऐवजी लगेच आपापले मोबाईल फोन काढून कुठे एस एम एस कर, नाहीतर कोणालातरी मिस्ड कॉल दे असं करायला लागतात. माणूस एखाद्या चित्रपटगृहामध्ये असो, गाण्याच्या कार्यक्रमामध्ये असो किंवा अगदी 'नेहमीच्या रुटीनपासून ब्रेक' म्हणून एखाद्या शांत ठिकाणी आलेला असो, 'आपण आत्ता कुठे आहोत, आणि काय करत आहोत' याचं 'अपडेट' फेसबुक किंवा ट्विटरवर टाकल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. माझा एक मित्र मध्ये इथे एका अमेरिकन विवाहसोहळ्याला गेला होता. त्याने तर लग्नाच्या सजावटीत कोणती फुलं वापरली आहेत इथपासून त्यानं लग्नात शॅम्पेनचे किती ग्लास (फुकटात!) रिचवले इथपर्यंत अपडेटस दर पाच मिनिटाला एक या गतीने फेसबुकवर टाकून उच्छाद आणला होता! पण काहीवेळा समजत नाही की ही कायम जगाच्या संपर्कात साधायची तळमळ असते, की आपलं, आपल्या श्रीमंतीचं, आपल्या भावनांचं

संबंधित बातम्या

- ढोमणे दाम्पत्याला अमेरिकेत रसिकांची दाद
- दुसरे टोक (भाग २)
- दक्षिण अमेरिकेतील तरूण 'मराठी' प्रवास...
- दुसरे टोक (भाग ४)
- अमेरिकेच्या उत्तरेस हिमवादळाचा कहर

ताज्या घडामोडी

- उकिरडा झालेल्या पालिकेचे पवित्र मंदिर बनवू या
- दोन सूर्य अनुभवलेला ग्रह
- लेखाजोखा यंदाच्या पुरुषोत्तमचा
- इराण, श्रीलंकेच्या नेत्यांशी पंतप्रधानांची चर्चा
- पंतप्रधानांना जाळ्यात ओढण्याचे प्रयत्न
- आज प्रणव मुखर्जी पंतप्रधानांना भेटणार

विनाकारण मांडलेलं प्रदर्शन असतं? माझ्या ओळखीचं एक जोडपं आहे.

त्यांच्या घरी केव्हाही जावं तर एकतर स्मशानशांतता असते किंवा भांडणाचे आवाज असतात. पण इंटरनेटवर पहावं तर हेच दोघं 'आम्ही एकमेकांच्या कित्ती प्रेमात!' याचं जाहीर प्रदर्शन करत असतात. यातून ते लोकांना फसवतात की स्वत:ला, देव जाणे! या माध्यमांतून 'ही पहा आमची नवीन गाडी', 'हे पहा आमचं नवीन घर', 'ही पहा माझी नवीन हेअर-स्टाईल',असं सचित्र प्रदर्शन मांडायचीही चांगली सोय उपलब्ध झाली आहे. पण फेसबुक किंवा ट्विटरवरच्या तुमच्या 'कॉटॅक्टस' मध्ये तुमच्या जीवश्चकंठश्च मित्रांपासून ते तुमच्याशी नुसतीच तोंडओळख असलेले लोकपण असतात, त्या सगळ्यांनाच ही माहिती कशाला? मग यावर तुमचा मित्रपरिवार 'हाऊ नाईस!' किंवा 'सो क्यूट!' असल्या काहीतरी अनिवार्य कॉमेंटस देतो आणि तुम्हालाही कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं. यातलं खरं किती आणि खोटं किती कोण जाणे! आपुलकीनं एखाद्याच्या खरंच जवळ जाऊन विचारांची, माहितीची देवाणघेवाण करण्याऐवजी आपल्या 'कम्फर्ट झोन' मध्ये एखाद्या बुडबुड्यामध्ये बंदिस्त राहिल्यासारखं राहून बाहेरच्या जगाशी संपर्क ठेवायचा, हा आजच्या कम्युनिकेशनचा मंत्र झालाय! म्हणून आजकालचे 'चॅटिंग प्रोग्रॅम्स' सुद्धा तुम्हाला एकाच वेळी हवं त्याच्यासाठी 'ऑनलाईन' आणि नको त्याच्यासाठी 'इनव्हिजिबल' रहायची सोय करून देतात!

पण एकदा या बुडबुड्यात बंद झालं की सगळीच बंधनं सुटतात की काय, कोण जाणे! इथं अमेरिकेतले टीन एजर्स आपल्या पार्ट्यांचे, त्यातल्या धांगडधिंग्याचे आणि चाळ्यांचे हवे ते फोटो सोशल नेटवर्किंग वेबसाईट्सवर टाकतात. या वेबसाईट्सची 'प्रायव्हसी सेटिंग्ज' नेहमीच संशयास्पद असतात.

त्यामुळं हे फोटो नक्की कोणाकोणापर्यंत पोचतील हे सांगता येत नाही. पण त्याचं त्यांना काहीच नसतं. पण हीच मुलं आपल्या आईवडिलांना मात्र आपल्या 'फेसबुक प्रोफाईल'वर फिरकायला मज्जाव करतात (इतकंच काय, घरात आपल्या बेडरुमचं दार वाजवल्याशिवाय त्यांना आतपण येऊ देत नाहीत!). फक्त टीनएजर्स कशाला, जगभरातले सगळ्याच थरातले स्त्रीपुरुष या वेबसाईटसवरून त्यांचे कुटुंबिय, मित्र, सहकारी इथपासून ते अगदी एखाद्या विशिष्ट धर्माच्या, वर्णाच्या किंवा देशाच्या लोकांबद्दल ज्या जाहीरपणे मुक्ताफळं उधळत असतात, ते पाहून काहीवेळा थक्क व्हायला होतं! काही काळापूर्वी ज्या गोष्टी सामाजिकदृष्ट्या निषिद्ध मानल्या जायच्या, त्या आज अगदी उघडपणे मिरवल्या जातात आणि त्यांच्याकडं दुर्लक्ष केलं जातं. याचा अर्थ एखादी गोष्ट जितकी खालच्या दर्जाची तेवढी ती अधिक 'कूल' असं समीकरण रुढ होतंय का? की अशा गोष्टींकडं कानाडोळा करायची आपली क्षमता वाढत चालली आहे?
सोशल नेटवर्किंग फक्त तुमच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावरच परिणाम करतं असं नाही, तर तुमची व्यावसायिक प्रतिमासुद्धा त्याच्यावर अवलंबून असते. बरेचवेळा एखाद्याला नोकरी देताना, जागा देताना (आणि मुलगी देतानासुद्धा!) त्याचं नाव 'गूगल' केलं जातं आणि त्याचा संबंध कुठल्या नको त्या गोष्टींशी आला नाहीये ना, हे तपासून पाहिलं जातं. अशावेळी तुमची इंटरनेटवरची प्रतिमा स्वच्छ असणं अतिशय महत्वाचं ठरतं.

अगदी नोकरी मिळाल्यावरसुद्धा या सोशल नेटवर्किंग साईटस वर तुम्ही कसं वागता, हे तुमचा एम्प्लॉयर बघू शकतो. अशी फेसबुक किंवा ट्विटरवर काहीतरी वेडंवाकडं लिहिल्यामुळे नोकरी गेल्याची बरीच उदाहरणं ऐकायला मिळतात. अलिकडेच एका महागड्या रेस्टॉरंटमध्ये काम करणाऱ्या वेट्रेसनं एका खड्ढस कस्टमरने कमी 'टिप' दिल्याबद्दलचा राग भडाभडा फेसबुकवर जाऊन ओतला. हे तिच्या मॅनेजरला कळालं आणि तिला तडकाफडकी नोकरीवरून काढण्यात आलं-कस्टमरबद्दल वाईट बोलणारे कर्मचारी आम्हाला नकोत म्हणून! घटनेनं तिला बहाल केलेलं भाषणस्वातंत्र्य तिची नोकरी टिकवायला उपयोगी पडलं नाही! कदाचित आपण कॉम्प्युटरसमोर एकटेच बसून आपले विचार टाईप करतो किंवा फोटो अपलोड करतो, तेव्हा हे विसरायला होतं

की ही सर्व "सामाजिक" माध्यमं आहेत. इथं आपण जे काही करतो ते सगळं जग पाहू शकतं. आणि या माध्यमांची ताकद इतकी आहे की कितीही काळजी घेतली तरी इथली कोणतीही गोष्ट खऱ्या अर्थानं प्रायव्हेट ठेवता येत नाही किंवा पूर्णपणे 'डिलीट' पण करता येत नाही.

याचा सगळा दोष तंत्रज्ञानाला देऊन मोकळं व्हायचं का? कुठलंही तंत्रज्ञान आपल्याला चांगलं किंवा वाईट कधीच बनवत नाही, ते फक्त आपल्यातला चांगुलपणा किंवा वाईटपणा पटकन बाहेर आणायला मदत करतं. आजच्या झपाट्यानं पुढं सरकणाऱ्या जगात सोशल नेटवर्किंग पासून पूर्णपणे अलिप्त राहणं अवघडच आहे. पण त्याच्या बेताल वापराकडं आणि त्यातून निर्माण होणाऱ्या धोक्याकडं दुर्लक्ष करायचं, की या सामर्थ्यशाली माध्यमाचा सुजाणपणे उपयोग करायचा-निर्णय आपल्याच हातात आहे!

## प्रतिक्रिया

On 03/10/2010 12:31 AM **poonam** said:

खूपच छान लेख. सत्यस्थिती आणि भविष्यातील धोक्याची कल्पना अगदी सहज सोप्या शब्दात मांडली आहे.

On 9/13/2010 8:10 PM **Amruta Pangu** said:

लेख खूप छान आहे. तुझे विचार खूप व्यवस्थित शब्दात मांडले आहेस.

On 9/10/2010 11:37 PM **Abhijeet, Bostan** said:

लेख खूपच सुरेख आहे. माझे एक नातेवाईक म्हणाले त्यांना त्याच्या स्वतःच्या मुलापेक्षा एका मैत्रिणीच्या मुलाचे updatets जास्त माहित असतात, कारण ती दर तासाला twitter वरती updatets पोस्ट करते!!! कालाय तस्मै नमः !

On 9/10/2010 11:54 AM **bharti** said:

कुठे तरी ( facebook , twitter ) यावर आपली मत , आपल्या मनातल मोकळं करता येत .नाही तर या दुप्लोमातिक दुनियेत कुणा जवळ सत्य सांगता येत नाही ..

On 9/10/2010 8:15 AM **Mithun** said:

thanks! agadi mazya manatal lihlat dr aapan!

On 9/10/2010 3:23 AM **abhijit pangu** said:

खूप छान विश्लेषण . . कीप इट उप!

On 09-09-2010 14:46:27 **garry** said:

nice thoughts.......... it realises me to think upon it.

On 9/8/2010 9:34 PM **smita** said:

changala lekh!!

On 9/8/2010 4:30 PM **Vikrant, Chicago** said:

लेख चांगला आहे. कालाय तस्मै नमः:

On 08-09-2010 14:05:17 **santosh** said:

डॉ. गौतम पंगू, लेख खूप आवडला. आभारी आहे.

On 8-9-2010 13:10 **Richa** said:

खरी परिस्थिती तुम्ही फार सुंदर मांडली आहे.सगळ्यांनी वाचण्या सारखा लेख आहे.

**तुमची प्रतिक्रिया लिहा** Login

* **Name:** * **Email:**

* **Comment:** (Press Ctrl+g to toggle between English and Marathi)

0/500

powered by Google™

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ऑ ओ औ अं अः

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | का | कि | की | कु | कू | कॅ | के | कै | कॉ | को | कौ | कं | कः |
| क | ख | ग | घ | ङ | च | छ | ज | झ | ञ | ट | ठ | ड | ढ |
| ण | त | थ | द | ध | न | प | फ | ब | भ | म | य | र | ल |
| व | श | ष | स | ह | ळ | क्ष | ज्ञ | | | | | | |

Submit





**Find your Old Friends**
Even if they're not on Faceb'ok! ( Takes 10 Minutes to Visit )
Google द्वारे जाहिराती


**आजचा सकाळ...**


**बातम्या:** पुणे | मुंबई | पश्चिम महाराष्ट्र | मराठवाडा | विदर्भ | कोकण | महाराष्ट्र | देश | विदेश | अर्थविश्व | उत्तर महाराष्ट्र

**संवाद:** मुक्तपीठ | पैलतीर | मधुरांगण | ब्लॉग

संपादकीय | फॅमिली डॉक्टर | मनोरंजन | क्रीडा | फीचर्स | RSS Feeds

Advertise With Us | About Us | Contact Us | RSS Feeds | Archives | Group Site | SakaalTimes | Subscribe | एग्रोवन | साप्ताहिक सकाळ | Work with Us



© Copyrights 2009 eSakal.com - All rights reserved. Powered By: of